राज्यातील बिगर इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये इ.१ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना गणित व इ.६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान हे विषय ऐच्छिक स्वरूपात इंग्रजी भाषेतून शिकविण्यास परवानगी देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः पीआरई-१७१३/(८६/१३)/प्राशि-५,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,
तारीख: १९ जून, २०१३.

<u>वाचा —</u>

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.सुप्राअ-२००४/(८/०४)/प्राशि-५, दि.१० फेब्रुवारी, २००४,

२) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.सुप्राअ-२००६/(१३६/०६)/प्राशि-५, दि.२२ नोव्हेंबर, २००७,

३) केंद्र शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९,

४) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११,

५) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई-१२१२/(६/१२)/प्राशि-५, दि.२० जून, २०१२,

६) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई-१४११/(१७५/११)/प्राशि-५, दि.२७ जुलै, २०१२,

७) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई-१४११/(१७५/११)/प्राशि-५, दि.२८ डिसेंबर, २०१२,

८) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.प्राशातु-१११२/(२५८/२०१२)/प्राशि-३, दि.१३ फेब्रुवारी, २०१३.

## प्रस्तावना —

केंद्र शासनाने भारतीय राज्य घटनेत सन २००२ मध्ये दुरूस्ती करून ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण (इ.१ ली ते ८ वी) मिळण्याचा मूलभूत अधिकार प्रदान केलेला आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ पारित केला असून त्याची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०१० पासून राज्यात सुरू झालेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२ एप्रिल, २०१२ रोजी हा कायदा वैध ठरविला आहे.

२. राज्य शासनाने शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाची भूमिका कायम घेतलेली आहे. राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असल्याने शासनाने सर्वत्र प्राथमिक व माध्यमिक शाळा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. सद्यस्थितीत राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनामार्फत सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरू असून त्यात सुमारे १.८० कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या १ लाख शाळांपैकी ३२५७३ शाळा खाजगी आहेत. त्यापैकी २०,४५५ अनुदानित व १२,०१८ विना अनुदानित आहेत.

३. प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शासनाने वेळोवेळी विविध उपाययोजना केलेल्या आहेत. त्यामध्ये भौतिक सुविधा निर्माण करतानाच शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता इत्यादीमध्ये सुधारणा करण्यात करण्यात आलेल्या आहेत. राज्य शासनाकडून शालेय शिक्षणामध्ये गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध कार्यक्रमही राबविण्यात येत आहेत.

४. राज्यातील बिगर इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना इंग्रजी या भाषेबाबत भविष्यात अडचणी निर्माण होवू नयेत या दृष्टीने दि.१० फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयान्वये बिगर इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इ.५ वी ते ७वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान हे विषय इंग्रजी माध्यमातून शिकविण्यास परवानगी देण्यात आली. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.सुप्राअ-२००६/(१३६/०६)/प्राशि-५, दि.२२ नोव्हेंबर, २००७ अन्वये राज्यातील बिगर इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान हे विषय ऐच्छिक स्वरुपात इंग्रजी भाषेतून शिकविण्यास परवानगी देण्यात आली.

५. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० नुसार इ.१ ली ते ८ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार सुधारीत विषयरचनेस शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई-१२१२/(६/१२)/प्राशि-५, दि.२० जून, २०१२ अन्वये मान्यता देण्यात आली.

६. तसेच, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई-१४११/(१७५/११)/प्राशि-५, दि.२७ जुलै, २०१२ अन्वये राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००५ नुसार प्राथमिक शिक्षण (इ. १ली ते ८ वी) अभ्यासक्रम पुनर्रचनेसाठी राज्यस्तरीय समिती व विषयनिहाय अभ्यासमंडळे गठीत करून अंमलबजावणी करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले.

७. शासन निर्णय दि.२० जून, २०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेल्या सुधारित विषययोजनेनुसार प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ (इ.१ ली ते ८वी) ला शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई-१४११/(१७५/११)/प्राशि-५, दि.२८ डिसेंबर, २०१२ अन्वये मान्यता देण्यात आली. प्रचलित अभ्यासक्रमातील इ.१ ली व २ री च्या परिसर अभ्यास या विषयातील आशय पुनर्रचित अभ्यासक्रमात भाषा व गणित या विषयात एकात्मिक पध्दतीने समाविष्ट करण्यात आलेला आहे. प्रचलित अभ्यासक्रमातील इ.३ री, ४ थी व ५ वी च्या सामान्य विज्ञान व सामाजिक शास्त्रे या विषयांचा आशय पुनर्रचित अभ्यासक्रमातील परिसर अभ्यास भाग १ व भाग २ या विषयात एकात्मिक पध्दतीने समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यामुळे परिसर अभ्यास भाग १ मधील विज्ञान विषय प्रचलित पध्दतीनुसार शिकविता येणार नाही. त्यामुळे राज्यातील सेमी इंग्रजी आकृतीबंध स्वीकारलेल्या शाळांना पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार इ. १ ली ते ५वी साठी केवळ गणित विषयाचे ऐच्छिक स्वरुपात इंग्रजीतून अध्यापन करावे लागेल आणि इ. ६ वी पासून गणित व विज्ञान हे विषय ऐच्छिक स्वरुपात इंग्रजीतून शिकविता येतील. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.प्राशातु-१११२/(२५८/२०१२)/प्राशि-३, दि.१३ फेब्रुवारी, २०१३ अन्वये इ. १ली ते ८वी पर्यंतचे शिक्षण प्राथमिक शिक्षण संबोधण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन, राज्यातील बिगर इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये इ. १ली ते ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गणित व इ.६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना गणित व

विज्ञान हे विषय ऐच्छिक स्वरूपात इंग्रजी भाषेतून शिकविण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय—

राज्यातील बिगर इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये इ. १ली ते ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गणित व इ.६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान हे विषय ऐच्छिक स्वरूपात इंग्रजी भाषेतून शिकविण्यास खालील अटींच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) बिगर इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये इ.१ ली ते ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गणित व इ. ६ वी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान हे विषय इंग्रजी भाषेतून ऐच्छिक स्वरूपात शिकविण्याची परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेची विषय शिकविण्याची क्षमता व पालकांची इच्छा विचारात घेऊन देण्यात यावी. त्यासाठी सक्ती करण्यात येऊ नये.

२) वरील विषय शिकविण्यासाठी अतिरिक्त शिक्षकांची पदे निर्माण करता येणार नाहीत. तसेच या विषयांसाठी कोणतेही अतिरिक्त अनुदान उपलब्ध करण्यात येणार नाही.

३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार प्राथमिक शिक्षकांकरीता (इ.१ ली ते ८ वी) शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक - आरटीई-२०१०/प्र.क्र.५७२/प्राशि-१, दि.१३ फेब्रुवारी, २०१३ मधील तरतुदीनुसारच सेमी इंग्रजी अध्यापन शिक्षण पध्दती अवलंबिणाऱ्या शाळांमधील शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य राहील. तसेच, संबंधित शाळेकरीता मंजूर शिक्षकांपैकी किमान एक शिक्षक इंग्रजी माध्यमातून शिक्षणशास्त्रातील पदविका (डी.टी.एड.) धारक असणे आवश्यक राहील.

४) वरील विषय शिकविणाऱ्या शिक्षकांना संबंधित संस्थेच्या विनंतीनुसार महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्यापरिषद), पुणे या संस्थेकडून प्रशिक्षण देण्यात येईल.

५) वरील विषय शिकविण्याबाबतचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्यापरिषद), पुणे यांच्याकडून तयार केला जाईल. तसेच, अभ्यासक्रमावर आधारीत शिक्षण साहित्य व पाठ्यपुस्तके महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे या संस्थेकडून तयार करण्यात येईल.

६) वरील शैक्षणिक अभ्यासक्रमाची अंमलबजावणी सन २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होईल.

७) ज्या शैक्षणिक वर्षापासून वरील अभ्यासक्रम शिकविण्यास सुरूवात करावयाची आहे, त्या वर्षापूर्वीच्या माहे डिसेंबर अखेर पर्यंत संबंधित शैक्षणिक संस्थेने पाठ्य पुस्तके व शिक्षण साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे या संस्थेकडे मागणी नोंदविणे अनिवार्य राहील.

८) राज्यातील बिगर इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये (इ. १ली ते ८ वी ) सेमी इंग्रजी अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी देण्यास शिक्षण संचालक (प्राथमिक) हे सक्षम प्राधिकारी राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०६२०१०२३१७९३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2013.06.21 12:34:38 +05'30'

(ना. उ. रौराळे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,

२. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,

३. मा. अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग), मंत्रालय, मुंबई,

४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,

५. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्यापरिषद), पुणे,

६. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे,

७. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,

८. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,

९. आयुक्त, महाराष्ट्र परीक्षा परिषद, पुणे,

१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.),

११. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,

१२. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),

१३. सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,

१४. शिक्षण निरीक्षक (पश्चिम/उत्तर /दक्षिण), मुंबई विभाग,

१५. ग्रामविकास विभाग/नगरविकास विभाग/आदिवासी विकास विभाग/अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१६. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,

१७. निवडनस्ती - प्राशि-५.